म्हाडा
MHADA

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
उप मुख्य अधिकारी (बीडीडी) मुं.मं. यांचे कार्यालय,
कक्ष क्र.२४० पहिला मजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा), कलानगर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०००५१

## जाहीर सूचना

मुंबई मंडळ, मुंबई अंतर्गत बीडीडी नायगांव, वरळी, ना.म.जोशी मार्ग येथील पात्र स:शुल्क पोलीस कर्मचारी लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासन निर्णय विभाग शासन निर्णय क्र.बैठक-२०२१/प्र.क्र.१/गृनिप दि.३०/०८/२०२२ अन्वये बांधकाम खर्च रक्कम रुपये १५,००,०००/- (पंधरा लाख) पुनर्विकसित इमारतीमधील कायमस्वरुपी मालकी हक्काने सदनिका पात्र पोलीस कर्मचा-यांनी म्हाडाकडे भरणा करणेबाबत शासन निर्णय झालेला आहे.

दि.३०/०८/२०२२ च्या शासन निर्णयानुसार बांधकाम खर्च रुपये १५,००,०००/- एवढ्या रक्कमेवर मुद्रांक शुल्क विभागाकडे चौकशी केली असता सदरहू दस्त नोंदणीसाठी मुद्रांक शुल्क विभागाकडे चौकशी केली असता सदरहू दस्त नोंदणीसाठी ५% मुद्रांक + १% मेट्रोसेस + १% नोंदणी फी अशी एकूण रक्कम रुपये १,०५,०००/- एवढा खर्च अपेक्षित असून सदरची रक्कम संबंधित पात्र पोलिस कर्मचारी गाळेधारकाने नोंदणी करारनामा नोंदणीवेळी संबंधित विभागाकडे भरणे अपेक्षित आहे. तसेच, सदर करारनामा संदर्भात भविष्यात वस्तू व सेवा कर (GST) लागू झाल्यास सदरचा कर भरण्याची जबाबदारी संपूर्णपणे पोलिस कर्मचारी लाभार्थ्यांची असेल.

(राजेंद्र गायकवाड)
उपमुख्य अधिकारी / बीडीडी / मुं.मं